(17)

**नोंदणीकृत टपालाने**

क्र.पोमसं/३/११/६/माअ बारवकर/३६२/२०१०
**पोलीस महासंचालक यांचे कार्यालय**
शहीद भगत सिंग मार्ग,कुलाबा,मुंबई-०१.
दिनांक :-१७/०१/२०११.

प्रति,

श्री.विलास दत्तात्रय बारवकर
रा.चाकण, ता.खेड, जिल्हा-पुणे.

संदर्भ :- आपला दिनांक ०६/११/२०१० चा अर्ज व त्यास अनुसरुन केलेला दि. ०३/०१/२०११ चा अपिल अर्ज.

विषयः- केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम-२००५
श्री.विलास दत्तात्रय बारवकर यांची विनंती.

-------०-------

महोदय,

आपल्या संदर्भाधिन अर्जास अनुसरुन दि.१७/१/११ रोजी ११०० वाजता सुनावणीस आपण उपस्थित राहिले असता आपण केलेली माहितीची मागणी ही पोलीस अधीक्षक, सोलापूर (ग्रा.) / पुणे (ग्रा.) या कार्यालयाशी संबंधीत असल्याने आपला अर्ज पोलीस अधीक्षक, सोलापूर (ग्रा.) / पुणे (ग्रा.) यांच्या कार्यालयांस पाठविण्यात येत आहे. तरी आपण पोलीस अधीक्षक, सोलापूर (ग्रा.) / पुणे (ग्रा.) या कार्यालयाशी परस्पर संपर्क साधावा.

२. जर उपरोक्त माहितीने आपले समाधान झाले नसेल तर सदरचे पत्र प्राप्त झाल्या दिनांकापासून ९० दिवसांचे आंत वरील अधिनियमातील नियम क्र. १९ (३) नुसार मा. राज्य माहिती आयुक्त, १३ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई-३२ याचेकडे आपणांस द्वितीय अपिल अर्ज सादर करणे आपणांस अनुज्ञेय आहे.

आपला विश्वासु,

**( डॉ.बी.के.उपाध्याय)**
शासकीय जन अपिलीय अधिकारी, तथा
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना),
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

ISSUED
19/1/2011

प्रत,

पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण / पुणे ग्रामीण.

२. सोबत संदर्भातील अर्जाची प्रत सहपत्रांसह पाठविली आहे. पोलीस अधीक्षक यांनी उपरोक्त माहिती ही अर्जदारास उपलब्ध करुन देण्याच्यादृष्टीने पुढील यथायोग्य कार्यवाही करावी व तसे या कार्यालयास कळवावे.

कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र. ३६.

E:\User\Documents\PINGALE\RTI\RTI_Letts.doc

**नोंदणीकृत**
**टपालाने**

क्र.पोमसं/३/११/६/माअ बारवकर/३९४/२०१०
**पोलीस महासंचालक यांचे कार्यालय**
शहीद भगत सिंग मार्ग,कुलाबा,मुंबई-०१.
दिनांक :- १५ /११/२०१०.

प्रति,

श्री.विलास दत्तात्रय बारवकर
रा.चाकण, ता.खेड, जिल्हा-पुणे.

संदर्भ :- आपला दिनांक ०६/११/२०१० चा अर्ज.

विषय :- केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५
श्री.विलास दत्तात्रय बारवकर यांची विनंती.

-------०-------

महोदय,

आपल्या संदर्भाधिन अर्जाचे अवलोकन केले असता, आपण उपस्थित केलेल्या ह्या कार्यासनाशी संबंधीत मुद्यांची माहिती खालीलप्रमाणे आपणांस उपलब्ध करुन देण्यात येत आहे:-

| मुद्दा | अभिप्राय |
|---|---|
| मुद्दा क्र.१ | सदरची माहिती या कार्यालयाचे अभिलेखावर उपलब्ध नाही, त्यामुळे ती आपणांस उपलब्ध करुन देता येत नाही. सदरची माहिती आपण पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांचेकडून परस्पर उपलब्ध करुन घ्यावी ; संबंधीत अधिकाऱ्यांचे सेवापुस्तक [redacted] त्या कार्यालयाकडे आहे. |
| मुद्दा क्र.२ | सदरची माहिती पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांचेकडून आपण परस्पर उपलब्ध करुन घ्यावी. |
| मुद्दा क्र.३ | प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती असल्याने माहितीचा अधिकार कलम-२ (च) अन्वये माहिती नाकारण्यात येत आहे. तरी देखील पोनि घाडगे हे सन-१९८२ च्या तुकडीचे पोलीस उपनिरीक्षक आहेत. त्यांना सपोनि व पोनि पदावर आदेश अनुक्रमे २६/०४/२००० व १०/०३/२००३ अन्वये पदोन्नती दिलेली आहे. सोबत सेवातपशीलाची प्रत जोडली आहे. |
| मुद्दा क्र.४ | पोनि घाडगे यांची कोल्हापूर परिक्षेत्रात असताना अनेक ठिकाणी बदल्या झालेल्या आहेत हे त्यांच्या सोबतच्या सेवाभिलेखावरुन दिसून येत नाही. मात्र सर्वसाधारण बदल्या-२०१० मध्ये त्यांची बदली पुणे ग्रामीण ते गुअवि, पुणे येथे करण्यात आली होती. परंतु मा.म.प्र.न्यायधिकरणाच्या च्या आदेशान्वये ती बदली रद्द करण्यात आलेली आहे. त्यामुळे त्यांची कोल्हापूर परिक्षेत्राबाहेर बदली केली नाही, या म्हणण्यात तथ्य नाही. |
| मुद्दा क्र.५ | पोनि घाडगे यांची सन-२००७ नंतर सार्वत्रिक बदल्या-१० मध्ये बदली |

| मुद्दा | अभिप्राय |
|---|---|
| | केलेली आहे. ती बदली मा.न्यायाधिकरणाच्या आदेशांन्वये रद्द केली आहे. ती कोणाच्याही शिफारशी अन्वये रद्द करण्यात आलेली नाही. |
| मुद्दा क्र.६ | सदर मुद्याबाबतची माहिती आपण विपोमनि, कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर यांचेकडे पत्रव्यवहार करुन परस्पर उपलब्ध करुन घ्यावी. |

२. आपले उपरोक्त माहितीमुळे समाधान झाले नसेल तर, सदर अधिनियमाच्या कलम १९(१) नुसार या कार्यालयातील नियुक्ती केलेले प्रथम अपिलीय अधिकारी, तथा विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्था.), पोलीस महासंचालक कार्यालय, म.रा., मुंबई यांना सदरहू पत्र प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आंत आपण आपला प्रथम अपिल अर्ज सादर करु शकता.

आपला विश्वासू,

(पं. कि. घुगे)

शासकीय माहिती अधिकारी, तथा
वरिष्ठ उप सहायक पोलीस महानिरीक्षक (आस्था.-१)
पोलीस महासंचालक, म.रा., मुंबई यांचे कार्यालय.

प्रत,

विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर
२. सोबत दि.०६/११/१० च्या अर्जाची प्रत पुढील योग्य त्या त्वरीत कार्यवाहीसाठी पाठविली आहे.

पोलीस अधीक्षक / पुणे ग्रामीण.
२. सोबत दि.०६/११/१० च्या अर्जाची प्रत पुढील योग्य त्या त्वरीत कार्यवाहीसाठी पाठविली आहे.

कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र. ३६.